होताच पाठमोरे, कुंपण मळ्यास खाते,
विश्वास घातकाचा, देवु किती पुरावा?

तृषार्त या धरेचा, सुकुन कंठ गेला
आता कसा फुलांनी, मल्हार राग गावा.

विरली हवेत सारी, आश्वासने तयांची,
सांगा इथे कुणावर विश्वास मी करावा?

होता जरी न आले, मोठे इथे कुणाला.
का द्वेवभावनेने मनमोगरा झुरावा?

पटले मुळीच नाही, माझे इथे जगाशी
अपराध काय होता, माझा तरी कळावा

- गौरी सुरेश कथले

## पापा

दिन भर काम करते है अपने बच्चों के लिए,
बच्चे कुछ बन जाये इसलिये बडे कर्म है
मेरे पापा ने किया !
मेरे बच्चे खुश रहे यही है उनकी जिंदगानी
अपनी जरूरते न जानकर बच्चोकी खुशीया
पुरी करके कि है हमपे मेहरबानी !
सबके लिए माँ होती है ज्यादा और पापा
कम,
पर पापा हमारे लिए सहते है
बोहोत गम!
पापा करते है हमेशा ही गुस्सा,
पर उनकी परेशानीयो का वो किसे सुनाये
किस्सा!
पापा होते है दिलले बहुत खास,
अपने बच्चे अच्छे बने बस यहीं है उनके
दिलमें एक आस !

-समिक्षा विलास इंगोले

## बाबा स्वप्नाची दिशा

स्वप्नाची दिशा म्हणजे च बाबा
स्वप्नाची आठवन करून देनारी व्यक्ती
बाबा....

आपल्या साठी स्वताचे स्वप्न, इच्छा अपुरी
ठेवनारे.
न सांगता आपल्या गरजा समजून घेतात
स्वत:ची गरज बाजुला करून
आपल्या गरजा पूर्ण करता...

ऐवढेच नव्हे तर आपल्या सर्व इच्छा पुर्ण
करण्यासाठी उपार कष्ट करतात

देवा कडे सुद्धा आपल्याच साठी मागणे मागतात.
हे दुसरे कोणी नाहीतर फक्त बाबाच करतात

म्हणुनच तर म्हणायला हरकत नाही की...
स्वप्नाची दिशा आणि आपले महत्व कडवून
देणारी व्यक्ती म्हणजेच फक्त आणि फक्त बाबाच
असतात!

-समिक्षा विलास इंगोले

## शिवराय

सत्याची ढाल होती
निष्ठेची तलवार,
विरतेचा भाला होता
हर हर महादेवाचा नारा होता
सहयाद्रिची साथ होती
जिजाऊची आशिर्वाद होता
मरणाची भिती नव्हती
स्वराज्य हाच ध्यास होता

तोफांचा आवाज होता
घोड्यांच्या टापांचा नाद
कडेळवारी फिरत होता
मर्द मराठ्यांचा वाघ
यौवनाच्या हाती राम
पडता भूमी कमी पडली ज्यांच्या भीतीने
राजे छत्रपती त्यांचे नाव.

– संकलन –
समिक्षा विलास इंगोले

## सुविचार

१) सुर्याकडे आपण डोळे पूर्ण उघडे ठेवून.
पाहू शकत नाही हा सुर्याचा दोष नसून.
आपल्या डोळयांचा असतो.

२) पणती ने पेटवावी पणती व, सारे आसमंत
उजळून निघावा, हाच प्रकाशाचा धर्म आहे.
शिक्षणातून साधावा विकास व परीसरात
पसरावा प्रकाश.
हेच आयुष्याचे मर्म आहे.

३) जरी आकाश असेल उंच, नसावी मनखत
आहे मजपाशी पंख, उडावे मी उंचच उंच.

४) कर्तुत्व श्रेष्ठ असलं कि, माणसांच चित्र एक
दोन रेषांमध्ये सुद्धा ठळक दिसत.

५) तारे सदैव चमकत असतात, पण अंधार
पडल्यावरच त्यांचे अस्तित्व जाणवनते.

६) यशस्वी आयुष्यापेक्षा,
समाधानी आयुष्य केंव्हाही चांगलं
कारण......
यशस्वी व्याख्या लोक ठरवितात
आणि समाधानाची व्याख्या
आपण स्वतः सिद्ध करतो.



– संकलन –
**दीक्षा अहेरवाल**

## कविता

झालास तु साहेब जरी
विद्यार्थीपणाला विसरु नको
घडलास तु समाजामध्ये
मात्र समाज विसरू नको
पैशाच्या पायी सर्व भूल पडते
सहावे वेतन आहे
तुला काय कमी आहे
दान धर्म करण्यासाठी मागे टचरू नको
घडलास तु समाजामध्ये.
मात्र समाजाला विसरू नको
खाशील तु गोड–धोड
उधळून पैसा सारा
करशील धुळधानी
आई–वडील आहे
त्यांना भूके ठेवू नको
घडलास तु समाजामध्ये
मात्र समाजाला विसरू नको
जर झाल तुझ्याकडून तर उपदेश करीत चाल
तुझ्यासारखा गरीब लेकरू पुढे घाल
शिकला असशीन कॉलेजात
पण अंगणवाडी विसरू नको
घडलास तु समाजामध्ये
मात्र समाजाला विसरू नको
सत्य नसेल अर्धे कधी
नसतो विश्वास अंध
तु होशी ल फूल तरच
आतून दरवळल गंध

**– प्रतिक्षा देशमुख**

## मैत्री (चारोळ्या)

मैत्रीचे दिवस इवल्याशा
पक्ष्यासारखे असतात.
भुर्रकन उडून जातात
नंतर उरतात ती
आठवणीची पिसे
काही मऊ काही खर खरीत
काही काळी, काही पांढरी
जमा होतील तेवढी तिची पिसे
आपण गोळा करायची त्यांना गुंफवून
बनवायची आठवणीची चटई
आयुष्याचा संध्याकाळी निवांत पडण्यासाठी.
न संपणारे एखादे
स्वप्न असावे
न बोलता ऐकू येतील
असे शब्द असावेत
ग्रीष्मातही पाऊस पडेल
असे ढग असावेत
आणि न मागता साथ देतील
असी मैत्री असावी.
आनंदी समयी साथ चालवणारी
मनाचे कवाडे उघडून डोकावणारी
काही गुशी तांचे राखण करणारी
मन मोकळं करून सारं सांगणारी
सांगता सांगता मोहीत करणारी
मैत्री असावी मैत्री सारखी
हसत राहणारी
हमवत राहणारी.

**- समिक्षा वहिले**

## श्रीमंत



नियंत्याने हात दिले
छातीत दिली हिम्मत
म्हणूनच जगही करते
खरीच आमची किंमत
मेहनतीचे बी रुजवतो
तेव्हा मिळते भाकर
नशिबाच्या माथी आम्ही
नाही फोडत खापर !
मजूर आम्ही आमचे
भांडवल आहे कष्ट
म्हणूनच जीवनात आम्ही
राहत असतो मस्त
घामाचेही आमच्या
सुगंधित उत्तर होते
निद्रादेवी सन्मानाने
आपल्या देशी नेते
कितीही अखंड लोळा
सुवर्ण वैभवात तुम्ही
या दुनियेत तर खरे
जिवंत श्रीमंत आम्हीच !

- संकलन -
**आकांक्षा राम हजारे**

# कली

एकाच कुशीतून जन्मलेले,
एकाच मातेच्या दुधावर पोसलेले,
एका ताटात जेवलेले,
कधी काळी एका पांघरुणातझोपलेले,
दोघांचेही एकच सलग आभाळ असलेले
आम्ही दोघे सख्ये भाऊ
आज छपराचे तुकडे वाटून घेतोय,
वडिलांच्या पासबुकाची पाने फाडून घेतोय.
मायच्या प्रेमाचे चकचकीत सुरीने
वाटे-हिस्से करून घेतोय
राहत्या जागेचे माळवढी खण
स्वयंपाकाची भांडीकुंडी
पेले, ताटे वाट्या, चमचे
यांची मोजदाद करीत आहोत
व्यवहारी जगाच्या कलीने
मानवी प्रेमभावनेची केवढी
क्रूर चेष्टा केली आहे !


- सोपान राऊत

# आत्मविश्वास

झेप घेण्या आकाशी
आत्मविश्वास ठेव तुझ्या पंखावरी
आजची तमा न बाळगता
लढ उद्याच्या यशापरी
ना मित्र इथे, ना नाते इथे
जो तो आपला स्वार्थ साधत बसे
संकटाच्या भोवऱ्यात कुणी न कुणाचा खास
या जीवन प्रवासात एक सख्या तुझा आत्मविश्वास.

- कु. पल्लवी मुकुंदराव भागवत

# कोरोना गाणा



घरात रहा गर्दी नका करू, याची मुळीच कल्पना नव्हती....या कोरोना न आपत्ती आणली बाई मोठी

सारा आपला देश सुखात नांदत होता, या बाई कोरोनाचा मुळीच पत्ता नव्हता... घरात रहा गर्दी नका करू याची मुळीच कल्पना नव्हती...
या कोरोनान आपत्ती आणली बाई मोठी.....

गोर गरिबांना खायला अन्न मिळत नव्हत, उपाशी मेले, भिती ने मेले, तवा बाई संकट होत मोठ या मोठी या कोरोनान आपत्ती आणली बाई मोठी.....

कोरोना असतांना पॉजिटिव्ह रिपोर्ट यायचा खूपच मेले चांगले ही झाले, आपत्ती होती बाई मोठी...
या कोरोना न आपत्ती आणली बाई मोठी....

या कोरोना मुळे एकच संदेश मिळाला किती ही मोठ संकट येवो, तरीही सामना केला.....
घरात रहा गर्दी नका करू, याची मुळीच कल्पना

- ऋचिता खोब्रागडे

## भरारी

ध्येय वेडे बाळगं उरी
जाणिव असुदे माणुसकीची खरी
काटे पसरलेले वाटे-वाटेवरी
तरी चाल गळ्या उद्याच्या आशेवरी
ठेव उंच उडण्याची तयारी
विश्वास ठेव तुझ्या कर्मावरी
स्वप्न पूर्ण करण्या,
घे क्षितीज भरारी.

- पायल साबळे

## आज पुन्हा एकटं वाटतयं.

सैरभैर नजरेला या सर्व अदृश्य वाटतयं
किलकिलणाऱ्या कानाला या सर्व बधिर भासतयं
क्षणभर शांतता ही हवीहवीशी वाटते
डोळ्यांत आसवांचे काहुर दाटते
अथांग सागरी किनाऱ्यावर मन जाऊन बसतयं
या गर्दीतही मला आज पुन्हा एकट वाटतयं
आज पुन्हा एकट वाटतयं.

- काजल मेंढे

## अमृतधारांचा शिडकावा

अमृतधारीचा शिडकावा दरवळतो दाही दिशा
दव बिंदू टिपती तुषार आणि निशा.
गंध बहरतो फुलांचा मातीसवे
अंबरी गवसणी घेती पक्ष्यांचे थवे.
हर्ष, उत्सहात नाहले चातक, मोर
काजव्यांनी केली गर्दी उजळले भोर.
लपंडाव खेळती, रात्रभर ढगाआड हा चांदवा
सुखद भासतो सर्व जीवां हा अमृतधारांचा
शिडकावा.

- गौरी डवंगे

## आयुष्य तेच आहे

हवं ते सहजासहजी मिळत नाही
मिळालं ते जास्त वेळ टिकत नाही
जीवनभर सुख पुरतं नाहीं
आणि दुःखा शिवाय हाती काही उरत नाही
सार जग पुढे गेलय
पण मी अजुनही तिथेच आहे
तेच धगधगतं मन आहे
आणि आयुष्य ही तेचं आहे.

- आसमा शेख

## नशिब

जीवन हा एक प्रवास आहे.
चालत राहणे कर्तव्य आहे.
काय आपणास मिळेल पुढे,
हा तर नशिबाचा भाग आहे.
कधी आनंद तर कधी दुःख
हा उन सावलीचा खेळ आहे.
आंबट, गोड नात्यांची इथे
एक चविष्ट भेळ आहे.
आयुष्य खुप सुंदर आहे.
जगता येणं महत्वाचे आहे.
अडचणी सर्वांनाच आहेत.
मात करणं महत्वाचे आहे.
आल्यास नको होऊ निराश.
खरंच इतकं ते कठीण नाही.
हे दिवस ही बदलून जातील,
स्थिर जगात असे काहीच नाही.
जिवन हा एक प्रवास आहे.
नशिब त्याचा एक भाग आहे

- वैभव तायडे

## कविता

विझलो आज जरी मी
हा माझा अंत नाही..
पेटेन उद्या नव्याने,
हे सामर्थ्य नाशवंत नाही...!!
छाटले जरी पंख माझे,
पुन्हा उडेन मी.
अडवु शकेल मला,
अजुन अशी भिंत नाही..
माझी झोपडी जाळण्याचे,
केलेत कैक कावे..
जळेल झोपडी अशी,
आग ती ज्वलत नाही,
रोखण्यास वाट माझी,
वादळ होती आतुर..
डोळ्यात जरी गेली धुळ,
थांबण्यास उसंत नाही..
येतील वादळे, खेटेल तुफान
तरी वाटचालता..
अडथळ्यांना भिवुन अडखळणे
पावलांना पसंत नाही....

- शुभांगी नामचंद्र पारधी

## सुविचार

नकारात्मक विचार केला तर प्रत्येक संधीमध्ये आपल्याला अडचणी दिसतात आणि सकारात्मक विचार केला तर प्रत्येक अडचणीमध्ये संधी दिसेल.

- अमन ननीर

## कसे असावे

लीन असावे पण दीन असू नये
अभिमान असावा पण गर्व असू नये
राग असावा पण द्वेष असू नये
काटकसरी असावे पण कृपन असु नये
उदार असावे पण उधळे असु नये.
कर्मनिष्ठ असावे पण कर्मष्ठ असु नये.
धर्मनिष्ठ असावे पण धर्मवेडे असू नये.

- रोहन भानुदास वारकर

## आमची मनीमाऊ

लांब लांब मिशा
गुबगुबीत अंग
आमच्या मनीमाऊचा
काळा पांढरा रंग
दुसरी मांजर दिसताच
गुरगुर करते
माणसे पाहून लाडाने
म्याऊ म्याऊ बोलते
मण्यांसारखे डोळे तिचे
चमके अंधारात
दूध प्यायला जाते
ती शेजाऱ्यांच्या घरात
माणसांकडून लाड ती
करून घेते किती
उदरांना तिची आता
उरली नाही भीती
रात्रीचे जागरण
तिला झेपत नाही
उदींर पळतो घरभर
महाराणी झोपी जाई.

- वैष्णवी दिवाकर देशमुख

## बोल मनातले

लिहता लिहता
मन माझे बोलले,
जीवन हे दुःखानीच
का. भरले सारे....
त्याचे बोलणे एकुण
ओठांवर स्मित हास्य आले.
मी म्हटल त्याला
दुःखाशिवाय जीवनात
आनंद तरी येईल कारे....

- कु. दिव्या प्रकाश गोलाम

## लोरी

दो नैनोके तुम दो किरण
एक मेरा दिल हे एक धडकन
ओ निदीया सुन केहेना
पलकों मे तू रेहेना
इन के लिये हे जीना
ये जीवन का गेहना
दो नैनो के तु दो किरण
एक मेरा दिल हे एक धडकन
मैं माँ हु नुर हु
कब तुमसे दूर हु
तुम मेरे अरमा हो
मेरी सासे मेरी जान हो
इनका हर गम सेहना
इनके लिये हे जीना
ओ निदीया सुन केहना
पलको में तु रेहना
दो नैनोके तुम दो किरण
एक मेरा दिल हे एक धड़कन

- निकीता संतोष मुगल

## जीव जडला...

मला तू आवडतोस
पण, तुला मी आवडत नाही,
माझं प्रेम आहे तुझ्यावर
पण, तु माझ्यावर प्रेम करत नाहीस....
अवघड झालयं तुझ्याशिवाय
जगणं आता,
पण, तुला मी हे
सांगूही शकत नाही...
भेटावस वाटतयं तुला
बोलावस वाटतयं तुझ्याशी,
पण, विचार करतेय
की तू बोलशील कारे माझ्याशी...
काय नाव दयावं
या प्रेमाला,
काही न बोलता
कळेल कारे तुला...
खुप जीव जडलाय
तुझ्यावरी,
पण, भीती वाट्टे
प्रेम व्यक्त करायची....


- अमरदीप वानखडे



## मेरी शाला

छोटे से बडा बनाया जिसने
माँ-बाप, सा प्यारा दिया जिसने
खुशी का हर पल दिया जिसने
दुःख का साया छूने न दिया जिसने
बहुत कुछ दिया जिस आँगन ने
कभी कुछ लिया नहि इस जीवन से
बहुत कुछ सिखाया जिसने
बहुत कुछ समझाया जिसने
हर सीख में प्यार हैं जिसके
नफरत से मुँह मोडना सिखाया जिसने
हर मुश्किल हल की जिसने
पूरा करने कि हिम्मतदी जिसने
गुस्से में भी प्यार है जिसके
शुक्रगुजार हैं हम इस मंदिर के
तराशा जिसने हमें हिरे स्वरूप
चुका नहीं सकते हम मूल्य इसका
जिसने दिया जीवन को सुंदररूप
करते हैं दिल से हम धन्यवाद सभी को
दिया जिन्होंने सहारा सपनों को
भुलेंगे नहीं आप सभी को सदा
रखेंगे दिल में सदा
जा रहा है कहते-कहते
अलविदा अलविदा।


**- निकीता संतोष मुगल**



## मैत्रिण

असावी सर्व जन्म सोबती,
फक्त एक मैत्रिण
सांगावे सर्व दुःख तिला,
वाटुन तिचे दुःख घ्यावे.
दुःखात तिच्या व्हावे सहभागी,
आनंदात तिच्या व्हावे आनंदी.
फुलाप्रमाणे जपावे मैत्रिला,
कधीही कलंक न लागे तिला.
सर्व जन्मभर ती देईल साथ,
कधीही न करावा तिचा विश्वासघात.
मनातले भक्त तिलाच सांगावे,
आपण तिला समजून घ्यावे.
मैत्री असावी स्वच्छ,
न लेखावे खरी कधी तुच्छ.
तिच असते खरी सखी,
निभवते मैत्री आयुष्यभरी.
सर्वांना मिळो मैत्रिण खरी,
हिच प्रार्थना ईश्वरचरणी.

**- वैष्णवी श्रीराम गुल्हाने**



## तेव्हा डोळ्यात पाणी आलेच असेल ना?

आई, आपल्या रक्तमांसाचा गोळा
अनाथश्रमाच्या पायरीवर सोडून जाताना
तू पाठमोरी झालीस तेव्हा
माझी बाळमूठ तुझ्या पदरात
अडकलीच असेल ना?
आई,
मला सोडून जाताना
तुझ्या डोळ्यात पाणी
आलेच असेल ना
आपलं बाळ कस जगेल?
चिऊकाऊचा घास त्याला कोण
भरवेल?
या हरिणकाळजीने
आई तुझ्या डोळ्यात पाणी
आलेच असेल ना?
जेव्हा माझे कोवळे ओठ
रितेच हलत असतील
कदाचीत त्याच क्षणी तुझ्या दुधाचे साडे
हळूच पिळले जात असतील !
आई, माझा आर्त भुकेला टाहो आठवून
तुझ्या डोळ्यात पाणी आलेच असेल ना?
दोघांच्या वासनेची टिकार
त्यातूनच घडला असावा माझा आकार
अश्वत्थाम्यासारखी सत्यत राहील
आयुष्यभर ही जखम निराधार !
परंतू तुझ्या भक्कम आधाराने
फोफावलेलं नांदत गोकूळ बघून
आई, तुझ्या निराधार बाळाच्या आठवणीने
डोळ्यात पाणी येतच असेल ना?

- **निकीता संतोष मुगल**

## माझ्या दारावर मोर हा आला!

माझ्या दारावर मोर हा आला!
मोर म्हणून बोलावितो रे मोर
हा घुंगरू वाजवितो ।।धृ।।
पाठी न पेन्सील दे माझी आई
दे माझी आई दे माझी आई,
जाते मी शाळेला ग मोरं हा
घुंगरू वाजवितो ।।१।।
कानातले कुंडल दे माझी आई
दे माझी आई, दे माझी आई,
जाते मी नाचायल गं मोर हा
घुंगरूवाजवितो, ।।२।।
पायातले पैजन दे माझी आई,
दे माझी आई, दे माझी आई,
जाते मी नाचायला ग मोर हा
घुंगरु वाजवितो, ।।३।।

- **वैष्णवी चतुरकर**

## साक्षर

अन्न, वस्त्र, निवारा
ना कोणाचाही सहारा,
ना भुक, ना तहान
जरी आम्ही दिसतो लहान,
साक्षर होऊन व्हायचय महान
म्हणतात ना....
वेळ, काळ, नेहमीच सारखा नसतो
प्रयत्न केलेत, तर
कोणीही कोणापेक्षा कमी नसतो,
तसंच आम्ही सादर होऊन
मोठा बनायच्या प्रयत्नात असतो.

- **किरण ढोरे**

## आई....

आई साठी कसे लिहू
आई साठी पुरतील एवढे
शब्द नाहीत कोठे
आई वरती लिहिण्याइतपत
नाही माझे व्यक्तीमत्व मोठे।।
जिवन हे शेत तर आई म्हणजे विहीर,
जिवन ही नौका तर आई म्हणजे तीर
जिवन ही शाळा तर आई म्हणजे पाटी,
जिवन हे कामचं तर म्हणजे सुट्टी।।
आई तू उन्हामधली सावली
आई तु पावसाळ्यातली छत्री
आई तू थंडीतली शाल
आता यावीत दुःखे खुशाल।।
आई म्हणजे मंदीराचा उंच कळस,
आई म्हणजे अंगणातील पवित्र तुळस
आई म्हणजे भजनात गुणगुणावी अशी संतवाणी
आई म्हणजे वाळवंटात प्यावं अस थंडगार पाणी
आई म्हणजे आरतीत वाजवावी
अशी लयबद्ध टाकी
आई म्हणजे वेदनेनंतर
सर्वात पहिली आरोळी...

**- दीक्षा अहेरवाल**

## ✻ जीवन ✻

फिरण्याचे जीवन तुझे सारे
प्रयत्न वु अथक करत रहा
आयुल्याच्या धेयासाठी
विचारांना वळण देत रहा
अपयशला भिऊ नकोस.
नविन मार्ग शोधत रहा.
असेच जग जिंकत रहा.

**- किरण ढोरे**

## भविष्याचे दालन

कशाला हवे डेस्क बेंच इथे
शांत हा फुटपाथ आहे
चुकले जरी काही
तरी कचरा-पेटीवर
फळयाची साथ आहे
ताई,
तु माझ्या सोबतीने
शिक्षणाचे धडे गिरव
भविष्याच्या दालनातील
अधिकारिक खुर्ची मिळव

**- किरण ढोरे**

## अभ्यास परिक्षेचा



नको व्हायला कचरा
आमुच्या आयुष्याचा
डोळ्यांच्या बुबुळांना
पडु देत खाचा
घडने वा बिघडणे
हाती ज्याच्या त्याच्या
म्हणून रस्त्यावर करतो
अभ्यास परिक्षेचा

**- किरण ढोरे**

## बचपन में तो पहला शब्द

तूने माँ-माँ बोला था
तब ही तेरी माँ का मन
एक मोरनी बनकर डोला था
तेरे पीछे वो तो पागल बनी
ममता की छाँव का बादल बनी थी,
ऐसी ही माता को भूल न जाना,
ममता के कर्ज को जल्दी चुकाना
इस दुनिया को माँ की नहिना
सबको आज सुनानी है
माँ और बेटे के रिश्ते की
ये तों अमर कहानी है
माता ने बेटे को जनमदियां
बाप ने बेटे का सबकुछ किया;
तूने उसका क्या बदला दिया;
किसके भरोसे छोड़ दिया
माता-पिता को दु:ख देके
कहा से तू सुख पायेगा
जो माँ की ना सुनेगा
चाहे लाखो कमालों



चाहे करोड़ो भी कमा लेना
जिसने माता को नहीं जीता;
धिक्कार है उसका जीना;
गर्व ना कर तु धन का ओ पगले,
गाडी ये बंगले यही तो रहेंगें
माता-पिता की लेले. दुआई;
जीवन बनेगा तेरा सुखदायी ई;
माता को जो प्यार करें, वो लोग निराले होते है
जिसे माँ का आशिर्वाद मिले,
वो किस्मत वाले होते है
चाहे लाख करो तुम पूजा
और तीरथ करो हजार
मगर माँ-बाप को ठुकराया
तो सब कुछ है बेकार
जो माँ की ना सुनेगा, तेरी कौन सुनेगा
जो माँ को ठुकरायेगा,
दर-दर को ठोकर खायेगा
जो माँ को ना सुनेगा......

\- पायल महल्ले

## 'फॅशन'

फॅशन सारी देशात आली
दिसत नाही बायांची लुंगड अन साडी
मूल करतात केसांना पॉप
मुली घालतात कपडे हाप
कपड्यांची फॅशन मोठी झाली
भाजी विकते जिन्स घालून भाजीवाली
प्रत्येक जन आता स्वार्थासाठी झटतो.
ज्याच्या कानावर मोबाईल दिसतो
पत्राचा तर आता जमानाच गेला.
तो गेल्यावर मात्र दुरध्वनी आला
तरी कुठ मिळते समाधान
भ्रमणध्वनी आणुन लावले चिमण्यांचे पाहांन
वर मोबाईल तर मोबाईल
पण इंटरनेटही आणले
त्याचा गैरफायदा घेऊन सारे
चॅट करून राहयले
चित्रपट आणुन मनोरंजनाची घंटी वाजली.
यामधल्या पोरी पाहुन
सारी युवा पिढी बिघडली.
मानव एक पाऊल पुढे,
पण दहा पाऊल मागे राहीला.
प्रगती केली म्हणतो.
पण निसर्गाने हात सोडला.

\- सोपान राऊत

# शिक्षण हे वाघिणीचे दूध..........

''शिक्षण हे वाघिणीचे दूध आहे, जो ते प्राशन करील तो समाजावर होणाऱ्या अन्याय, अत्याचाराविरुद्ध बंड करून उठल्याशिवाय राहणार नाही.'' शिक्षणाचे महत्त्व विशद करणारा हा प्रेरणादायी मंत्र डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सुमारे पाऊणशे वर्षापूर्वी १९४९ मध्ये त्यांच्या जन्मदिनीच औरंगाबादेतून जगाला दिला होता. त्याच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची आठवण झाल्याशिवाय 'शिक्षण' या विषयावर लिहिणे किंवा बोलणे अशक्यच आहे!!!

आज शिक्षणाबद्दल समाजात मोठ्या प्रमाणात जागरूकता निर्माण झालेली आहे. प्रत्येक पालकाला असे वाटते की, आपल्या मुलाने खूप शिकावे. त्यासाठी तो आपल्या ऐपतीप्रमाणे खर्चही करत असतो. आज खेडोपाडी सरकारी व खाजगी शाळा पोहचलेल्या आहेत. केंद्र व राज्य सरकारेही शिक्षणावर बऱ्यापैकी खर्च करत असतात. (पण सरकारच्या निर्धारित उत्पन्नाच्या मानाने कमीच आहे.) असा शिक्षणाचा सगळीकडे उदो-उदो सुरूअसताना शिक्षणाची उद्दिष्ट्ये, फलश्रुती व मानवी जीवनातील शिक्षणाचे नेमके महत्त्व समजून घेणे आवश्यक आहे.

शिक्षणाची फलश्रुती

**१) ज्ञानवृद्धी**

शिक्षणाच्या माध्यमातून आपल्याला नवीन नवीन गोष्टींची ओळख होते, नवीन ज्ञानाची प्राप्ती होते, आपल्यामध्ये नवीन समज निर्माण होतात तसेच शिक्षणामुळे आपल्या ज्ञानामध्ये वाढ होते. मानवी जीवनाबद्दल, निसर्गाबद्दल एकूणच जगण्याबद्दल आपली समज, आकलन वाढते. ही समज-आकलन कशी वाढते? तर त्यासाठी अभ्यासक्रमात इतिहास, भूगोल, राज्यशास्त्र, समाजशास्त्र, मानसशास्त्र, अर्थशास्त्र, भाषा, विज्ञान, गणित इत्यादी विषयांचा समावेश केला गेलेला असतो. आपल्या जगण्याशी संबंधित जवळपास सर्व गोष्टींचा आपल्या शिक्षणात समावेश केला गेलेला असतो. आपले विविध विषयांचे, शास्त्रांचे ज्ञान वाढले तर त्याचा फायदा आपल्याला आयुष्यभर जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रामध्ये होतो. त्यामुळे आपल्यामध्ये संशोधकवृत्ती, नाविन्यपूर्णता, अभ्यासूवृत्ती, अचूक व तात्काळ निर्णय घेण्याची क्षमता, विवेकी दृष्टिकोण अशा अनेक गुणांची वाढ होते. आपल्यातील न्यूनगंड, मागासलेपणा कमी होऊन आत्मविश्वास, काळाबरोबर चालण्याची वृत्ती निर्माण होते. ही सर्व उद्दिश्ये पूर्ण होण्यासाठी मात्र दर्जेदार व गुणवत्तापूर्ण शिक्षणाची आवश्यकता असते. फक्त पदवी व नोकरीसाठी शिक्षण घेतले तर मात्र काहीच साध्य होणार नाही व शिक्षणातून जी फलश्रुती अपेक्षित आहे ती सुद्धा दुरापास्त राहण्याची दाढ शक्यता आहे.

**२) कौशल्यवृद्धी, कौशल्यनिर्मिती, कौशल्यविकास:**

जगण्यासाठी नुसते ज्ञान असून उपयोगाचे नसते. तर माणसाकडे अनेक कौशल्य देखील असायला हवीत.

त्यामध्ये विविध वस्तू निर्माण करण्याचे त्यावर प्रक्रिया करण्याचे त्या वस्तू विकण्याचे कौशल्य असायला हवे. प्रत्यक्ष जगण्यामध्ये संभाषण, वक्तृत्त्व, संवाद कौशल्य असणे किती गरजेचे आहे, हे वेगळे सांगण्याची आवश्यकता नाही! शिक्षणातून त्याचा विकास व्हायला हवा. आजच्या या माहिती तंत्रज्ञानाच्या युगामध्ये या क्षेत्राशी संबंधित असंख्य कौशल्ये आत्मसात करून त्यांचा वापर करता येणे, ही काळाची गरज बनलेली आहे. त्याशिवाय आपण आपली बरीचशी (जवळपास सर्वच कामे बिनचूक व वेळेवर पूर्ण करू शकत नाहीत, मोबाईल, कॉम्प्युटर यांचे ज्ञान असणे, ते सहज व सराईतपणे वापरता येणे, ही एक आवश्यक गरज बनून बसली आहे. याशिवाय अजून अशी असंख्य कौशल्य आहेत. ही सर्व कौशल्ये औपचारिक किंवा अनौपचारिक अशा कोणत्याही प्रकारच्या शिक्षणाशिवाय साध्य होऊ शकत नाहीत आणि या कौशल्यांशिवाय आपले जगणे, स्वतःचा, कुटुंबाचा, समाजाचा व एकूणच देशाचा विकास साधणे कठीण होऊन बसू शकते आणि म्हणून शिक्षणाचे हे दुसरे उद्दिष्ट असते.

**३) मानवी वर्तनात इष्ट बदल :**

राष्ट्रपिता महात्मा गांधीजींनी शिक्षणाची व्याख्या करताना म्हटले होते, ''शिक्षण म्हणजे व्यक्तीच्या वर्तनात झालेला इष्ट बदल होय.''

मित्रांनो, तुमच्याकडे अनेक विषयांचे खूप सारे ज्ञान आहे. असंख्य कौशल्येदेखील तुमच्यामध्ये आहेत. मात्र तुमच्या वर्तनात जर परिवर्तन झालेले नसेल, शिक्षणामुळे तुम्ही अधिक चांगले अधिक विवेकी, अधिक समजूतदार, अधिक विज्ञाननिष्ठ, अधिक प्रेमळ स्वातंत्र्य, समता, बंधुता, मानवतावाद इ. मानवी मूल्यांवर विश्वास ठेवून मार्गक्रमण करणारे बनत नसणार तर तुमच्या शिक्षणाला काहीही अर्थ उरत नाही.

दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे शिक्षणामुळे जर माणसाला ज्ञान व कौशल्य प्राप्त होत असतील तर त्याच्या वागण्यात एक प्रकारचा धाडसीपणा यायला हवा. समाजात घडत असलेल्या चुकीच्या गोष्टींना त्याने विरोध करायला हवा. अन्याय, अत्याचार याविरुद्ध संघर्ष करायला हवा. ज्ञान-विज्ञान-कौशल्य आत्मसात केलेली व्यक्ती अन्याय, अत्याचार, शोषण तसेच चुकीच्या गोष्टींविरुद्ध आवाज उठवणार नाही तर मग कोण उठवणार? चांगले उच्चशिक्षित व मोठ्या हुद्दयांवर काम करणारेसुद्धा प्रचंड भ्रष्टाचार, शोषण करताना दिसून येत आहेत. माणसातील माणूसपण, संवेदनशीलता संपून त्याचे अशा भ्रष्ट व शोषक पशूंमध्ये रूपांतर व्हावे, हे शिक्षणाचे उद्दिष्ट खचितच नाहीये! तेव्हा एक चांगला माणूस घडविणे, हे शिक्षणाचे महत्त्वाचे उद्दिष्ट असायला हवे. तरच मानवजातीत सौख्य व शांतता नांदेल अन्यथा नाही.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा 'शिका, संघटित व्हा व संघर्ष करा' हा संदेश सर्वांना ठाऊक आहे. शिका म्हणजे विविध विषयांचे ज्ञान घ्या, अनेक कौशल्य आत्मसात करा. त्यानंतर संघटित व्हा व माणसाला माणूस म्हणून जगता येईल, अशा प्रकारचा समाज निर्मितीसाठी संघर्ष करा. शिक्षणामुळे आपल्या वर्तनामध्ये या प्रकारच्या विधायक व सकारात्मक परिवर्तनाची आवश्यकता आहे.

**शिक्षणाचे महत्त्व**

शिक्षणाचा संबंध नोकरीशी व्यवसायाशी पैसे कमावण्याची क्षमता विकसित करण्याशी लावला गेलेला आहे. सरकारी नोकरी मिळत नसेल, तर इतके शिक्षण कशाला घ्यायचे, ही भावना वाढीस लागलेली दिसत आहे. पण असा विचार करून चालणार नाही. म. फुलेंनी भारतातील ९०% टक्के पेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या शूद्र वर्गाच्या मागासलेपणाचे त्यांच्या अनर्थाचे कारण 'विद्येचा अभाव' हे सांगितलेले होते. गाडगेबाबांनी 'घरातील भांडीकुंडी विका, पण शिक्षण घ्या', असा संदेश बहुजन समाजाला दिलेला होता.

थोडक्यात, शिक्षण हे व्यक्ती समाज तसेच राष्ट्राच्या जीवनामध्ये आमुलाग्र परिवर्तन घडवून आणत असते. शिक्षणाचे हे सामर्थ्य ध्यानात घेणे गरजेचे आहे.

– **डॉ. साजिद के. शाह**
(मराठी विभाग)




परत कधीतरी आठवणींच्या
पंखावर हे दिवस उडत येतील.
नको असलेल्या पण हव्या – हव्यासा वाटण्याऱ्या,
दिवसांना ताज्या करत जातील...!!!
खूप काही आहे सांगण्यासाठी,
मनात एक वादळ,
शांत चालू आहे,
पण वेळ कुठे आहे आता थांबण्यासाठी...!!!
सगळच बोलायचं – ऐकायचं,
खुप काही राहुन गेलय.
आठवणींचा एक घोळका,
मागे सुटुन गेलय–––!!!
पुन्हा हे आयुष्य जगण्याच्या,
इथ इच्छेत मरायचं,
आठवणींचा यावळीत मोगे,
कुठेतरी दूर वळुन बघायचं...!!!

इथेच कुणीतरी घडीचा,
काटा धरून ठेवावा,
आणि परत मागुन,
सुरुवाती पासुनच जगावा...!!!
हे कॉलेजचे दिवस

– **प्रा. अभिजीत ओमप्रताप ढोरे**

## हे कॉलेजचे दिवस ---

वाट बघत होता,
ह्या दिवसाची केव्हाच
स्वप्न सजवुन,
ठेवले होते उदद्याचे...!!!
खर तर आज ओठ,
बाहेरून खुप हसत आहेत.
पण डोळे मात्र
आतुन खुप रडत आहेत...!!!

हे कॉलेजचे दिवस,
इतक्या सहज निघतील.
मनाच्या अंगणात आठवणीचे,
कुंपण घालून जातील...!!!
आता पुन्हा नाही जगणार,
घ्या कॉलेजच्या दिवसात.
आता कुठुन भिजणार,
ह्या सुवर्ण काळाचा पावसात...!!!

**- धनती कोरडे**

## ''भारतीय स्वातंत्र्यलढ्याल अकोल्यातील मातृशक्तीचे योगदान''

१५ ऑगष्ट १९४७ ला अनेक वर्षाच्या गुलामगीरीनंतर स्वातंत्र्य मिळाले. हे स्वातंत्र्य व मिळवीण्यासाठी संपूर्ण भारतात भरपूर स्वरूपात प्रयत्न झाले यामध्ये स्त्रि असो, पुरुष असो, तरुण असो वा वृध्द असो प्रत्येकाने या स्वातंत्र्य यज्ञाल आपला सहभाग दिला.

यामध्येध अकोला जिल्हयाचेही योगदान खुप मोठे पुरुषांच्या बरोबरीने अकोल्यातील य महिलांनी स्वातंत्र्य लढ्यात दाखविलेले साहस अतुलनीय आहे येथील दुर्गाताई रामचंद्र जोशी या महिलेने अकोल्याच्या नगरपालीकेच्या इमारतीवर पहिल्यांदा तिरंगा फडकावत महिलांच्या कतृत्वाचा झेंडा रोवल्याच्या पाउलखुणा इतिहासात नोंदवील्या आहेत.१९२० च्या असहंकार चळवळीत अकोला शहरातील प्रतिष्ठीत व संपन्न घराण्यातील महिलांनी सक्रीय सहभाग घेतला. यातील अनेक महिलांना कारावास भोगावा लागला, दुर्गाताईनी महिलांमध्ये जागृती निर्माण करून त्यांना प्रत्यक्ष स्वातंत्र्य चळवळीत आणले. कमलाबाई भागवत, मनुलाई कोल्हटकर, गंगुबाई बापट, सरस्वती बाई गोयनका या शिक्षीत घराण्यातील महिलांनी १९२०च्या अरहकार चळवळीत प्रत्यक्ष भाग घेतला. दुर्गाताई जोशी संबंध जिल्ह्यातच नव्हे तर विदर्भभर प्रचार करित होत्या. १९३० साली त्यांच्या जोडीला ओक घराण्यातील राधाबाई ओक, सुशिलाबाई ओक या जिल्हाभर व्याख्यानाव्दारा प्रचार करीत होत्या. रमाबाई केळकर, उमाबाई मराठे, सुभद्राबाई जोशी यांनी प्रचार कार्य केले. कायदेभंग चळवळीत सुमारे ४५ महिला कार्यकर्त्यांना प्रत्यक्ष कारावासाच्या शिक्षा झाल्या. प्रमिलालाई ओक, ताराबेन मश्रूवाला या प्रत्येक लढ्यात आघाडीच्या लढाउ नेत्या होत्या. राधादेवी गोयनका १९४२ साली १५ दिवस स्थानबध्द होत्या. सावीत्रीबाई बियाणी, रमाबाई केळकर उमाबाई मराठे, उमाबाई खपली, रूख्मीनीबाई गोयनका, सरस्वतीबाई मेहरे, शुभगाबाई काशिकर यांनीही कारावास भोगला १९४२ च्या चळवळीत अनूसयाबाई भोपळे व विमलबाई देशपांडे यांचे पतिही तुरुंगात होते.

**- प्रा. उमेश एम. भदे**
इतिहास विभाग

# महात्मा गांधीजींची प्रासंगिकता

भारतीय स्वातंत्र्य लढयातील थोर स्वातंत्र्य सेनानी म्हणजे राष्ट्रपिता महात्मा गांधीजी होय. महात्मा गांधीजींचे पूर्ण नाव मोहनदास करमचंद गांधी. त्यांचा जन्म १८६९ साली गुजरात मधील पोरबंदर या ठिकाणी झाला. वयाच्या १२ व्या वर्षी कस्तुरबा सोबत त्यांचा विवाह झाला. १९ व्या वर्षी कायदद्याच्या अभ्यासासाठी म. गांधीनी इंग्लंडला प्रयान केले. त्यांच्या २२ व्या वर्षी इग्लंड येथे बॅरिस्टर ही पदवी प्राप्त केल्यानंतर राजकोट व नंतर मुंबई येथे वकिली करण्याचा प्रयत्न केला. म. गांधीजींचे राजकीय गुरु गोपाळ कृष्ण गोखले हे होते. गांधीजी दक्षिण आफ्रिकेत गेले असता रेल्वेच्या प्रथम वर्गाचे तिकीट काढलेले असतांना देखील इंग्रजांनी रेल्वेतून ढकलून देऊन अपमान करण्यात आला. ते २१ वर्ष दक्षिण आफ्रिकेत वास्तव्यास होते. ९ जानेवारी १९१५ रोजी ते भारतात आले. तेव्हा पासून त्यांनी स्वतंत्र्य लढयात सहभाग घेतला. म. गांधीनी भारतीय स्वतंत्र्य लढ्यात सहभागी झाल्यापासून गांधीयुग सुरु झाले. स्वतंत्र्य पूर्व काळात आपण पारतंत्र्यात असल्यामुळे भारतीयांवर अन्याय होत होता. खऱ्या अर्थाने अन्यायाविरुध्द लढण्याचे सामर्थ्य लोकांमध्ये निर्माण करण्याचे कार्य म. गांधीनी केले. जगात अनेक क्रांती घडल्या, अनेक स्वातंत्र्य युध्द झाले पण भारतीय स्वातंत्र्य लढा हा संपूर्ण जगात प्रसिध्द झाला कारण कोणत्याही रक्तपाताशिवाय भारतियांना स्वतंत्र्य मिळवून देण्याची किमया म. गांधीनी केली संपूर्ण जगात अहिंसा या तत्वाचा स्विकार केला गेला व आजही त्यावर सर्वाचा विश्वास आहे. म. गांधीनी भारतीयांच नाहीतर संपूर्ण जगाला अनेक विचारांची देणगी दिली आहे. जी विकासाची सद्भावनेची समानतेची, बंधुभावाची आहे. आजच्या काळात देखील मं. गांधीजीचे विचार भारताच्या समस्या सोडविण्यासाठी उपयुक्त आहेत. आजही भारतात अनेक समस्या आहेत. त्या सर्व समस्यांवर गांधीच्या विचारांनुसारच मात करता येते. अथवा त्यांची सोडवणुक केली जाऊ शकते.

**१) अन्यायाचा प्रतिकार करणे :-**

स्वातंत्र्योत्तर काळात इंग्रजांनी भारतीयांवर अनेक अन्याय अत्याचार केले. इंग्रजाविरुध्द बोलल्यास कारण नसतांना अटक करणे. शिक्षा करणे, पिळवणूक करणे, अशी शिक्षा केली जात होती. पण म. गांधीनी त्याला विरोध केला. तो स्वतः अनेक वेळा तरुगांत देखील गेले पण आन्यायाला वाचा फोडण्याचे कार्य त्यांनी सोडले नाही. आपल्या कार्यातून त्यांनी भारतीयांच्या मनात अन्याया विरुध्द लढण्याची प्रेरणा निर्माण केली. अन्याय करणारा देखील एक दिवस थकतो व सत्याचा विजय होतो हे त्यांनी त्यांच्या स्वातंत्र्य लढ्यातील कृतीतून संपूर्ण भारतीयांना शिकवले. आजही बऱ्याचदा एखाद्या व्यक्ती व समूहावर अन्याय झाल्यास त्याचा प्रतिकार करण्याची प्रेरणा भारतीयांना गांधीजीच्या विचारातून मिळते आज देश स्वतंत्र झाला असता तरी बऱ्याचदा भारतीय संविधानाने दिलेले मानवी अधिकारावर बंधने आल्यास त्याचा प्रतिकार कसा करावा याची शिकवण आम्हाला गांधीजीच्या विचारातून मिळते. म्हणून म. गांधीजींचे विचार आजच्या अनेक समस्या सोडविण्यासाठी उपयुक्त वाटतात.

**२) लोकशाही मुल्य जपण्यासाठी :-**

स्वातंत्र्य, समता, बंधुता, न्याय ही लोकशाहीची मुल्य आहेत. म. गांधीनी आयुष्यभर या मुल्यांची जोपासना केली. स्वातंत्र्यलढ्यास देखील या भारतातील सर्व लोक समान आहेत या तत्वांशी त्यांनी तडजोड केली नाही. जात, धर्म, पंथ, विसरुन आपण प्रथम भारतीय आहोत यासाठी भारतीयांच्या मनात देशा विषयी देशप्रेम निर्माण व्हावे यासाठी त्यांनी आयुष्यभर कार्य

केले. सांसारिक जीवन जगतांना देखील सर्व प्रथम देश व त्यानंतर सर्वकाही ही भावना स्वतःच्या कर्तत्वातून त्यांनी सिध्द केली. त्यातून भारतीयांच्या मनात राष्ट्राविषयी 'राष्ट्रप्रेम निर्माण होण्यास मदत झाली. राष्ट्रप्रेम निर्माण झाल्यामुळे लोकांच्या लोकशाही मुल्यावरचा विश्वास दृढ होत गेला. आजही स्वातंत्र्य, समता, बंधुत्व, न्याय ही लोकशाहीची मुल्य जोपासतांना म. गांधीजीचे विचार प्रासंगिक ठरतात. भारतियांच्या मनात राष्ट्रप्रेम निर्माण होण्यामध्ये ह्या भावना मदत करतात कारण सर्वांना समान संधी प्राप्त करण्यासाठी प्रयत्न केले. अर्थात म. गांधीनी सर्वांना समान संधी प्राप्त झालेल्या आहेत. अर्थातच म. गांधीनी आपल्या कृतीतून तशा प्रकारचा आदर्श भारतीयासमोर ठेवलेला आहे.

**३) अहिंचा हे मुल्य जोपासले :-**

संपूर्ण जगाला शांतीचा संदेश देणारे तथागत गौतम बुध्दाचा विचार महात्मा गांधींनी स्विकारून जगाला पून्हा शांतीचा अहिंसेचा मार्ग दिला. जगातील सर्वात मोठ्या राज्यसत्तेला अहिंसेच्या मार्गान हरविण्याचे कार्य म. गांधीनी केले. जगात अनेक स्वातंत्र युद्ध झाले. त्यात रक्तक्रांती झाल्याशिवाय स्वातंत्र्य मिळाले नाही पण भारतीय स्वातंत्र्य लढा अहिंसेच्या मार्गान लढला गेला आणि तो यशस्वी देखील झाला. अहिंसा याच मार्गाने जगातील सर्व प्रश्न मिटू शकतात हे त्यांनी सिध्द केले. आज अनेक देशांजवळ घातक क्षेपणास्त्र आहेत. प्रत्येक देश वसाहतवादाच्या कारणाने एकमेकांवर हल्ले करीत आहेत. अनेक देशांकडे अणुबॉम्ब आहेत. जर एकही देशाने दुसऱ्यादेशावर अनुबॉम्ब टाकला तर अनेक जीवीतहानी होऊ शकते. पर्यायाने पृथ्विवरील मानवाचा विनाश अटळ आहे. हा विनाश टाळण्यासाठी अहिंसा या तत्वाचा अंगीकार करणे हाच एकमेव उपाय आहे. आणि तो सर्वांनी पाळावा अशा प्रकारचा विचार म. गांधीनी मांडला आणि आज त्यांच्या विचारांवर प्रत्येकाने चालणे आवश्यक आहे. तरच विश्वशांती निर्माण होईल अन्यथा मानवजातीला धोका निर्माण होऊ शकतो. म्हणून अहिंसा हे तत्व आज ही भारतातील वा जगातील सर्व समस्या सोडविण्यासाठी उपयुक्त आहे.

**४) मानवतावाद -**

म. गांधीनी आयुष्यभर मानवतावादाचा पुरस्कार केला. मानवतावादी विचारसरणीचे से खंदे पुरस्कर्ते होते. व्यक्ती कोणत्याही जाती धर्माचा असो सन्मानपुर्वक जीवन जगणे आणि आपला सर्वांगीण विकास करुन घेणे. हा प्रत्येक व्यक्तीचा नैसर्गिक अधिकार आहे. तो नाकारण्याचा कुणलाही अधिकार नाही. प्राचिन काळापासून शक्तीशाली व्यक्ती कमजोर व्यक्तीना गुलाम बनवून आपले वर्चस्व प्रस्तापित करुन त्यांचे, आर्थिक, शारीरिक, मानसिक शोषण करीत असत. त्यातून जगात युध्दे देखील झालीत त्या युध्दाचे परिणाम सर्व सामान्य मानसाला भोगावे लागले जागतिक स्तरावर अशा प्रकारचे युध्द होऊ नयेत मानवहानी होऊ नये यासाठी जागतिक स्तरावर

प्रयत्न करण्यात आले. १० डिसेंबर १९४८ साली युनोच्या महासभेने मानवी हक्कांचा जाहिरनामा तयार केला त्याला मानवी अधिकारांची सनद असे म्हणतात त्यामध्ये नागरिकांना, सामाजिक, राजकिय अधिकारांबरोबर स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीने अधिकार देण्याची तरतूद करण्यात आली अर्थात हाच विचार म. गांधीजीचा होता. त्याच्या जीवनप्रवासात मानवी अधिकार व मानवतावाद दिसून येतो. आजही म. गांधीजीचा या मानवतावादी विचारसरणीची गरज भारतालाच नाही तर, जगाला आहे. आज स्पर्धेच्या युगात प्रत्येकाने आपल्या वर्तनामुळे दुसऱ्याला त्रास व्हायचा नको असे जर वर्तन केले तर सामाजात मानवतावाद वृध्दीगंत होईल आज खऱ्या अर्थाने म. गांधीजीच्या विचारांची उपयुक्तता संपूर्ण जगाला आहे यात शंका नाही.

**५) सर्वधर्म समभाव :-**

जात, धर्म, पंथ, वंश विसरुन आपण सर्व मानव एक आहोत होय भावना सर्व भारतीयांच्या मनात रुजविण्याचे कार्य मा. गांधीनी केले. भारताला स्वातंत्र्य मिळण्यापूर्वी वेगळ्या पाकिस्तान ची मागणी झाली. धर्माच्या आधारावर देशाची फाळणी करायला म. गांधीचा विरोध होता पण परिस्थितीने त्यांना मान्य करावे लागले दंगली सुरु झाल्या तेव्हा त्यांना किती वेदना झाल्या असतील ते त्यांनाच माहित पण सर्वधर्मसमभव ही भावना वाढीस लागण्यासाठी त्यांनी शेवटी आपल्या प्राणांची आहुती दिली. प्राण द्यावे लागले तरी त्यांना धर्मा धर्मात वाद नको याला महत्व दिले. आपण सर्व एका परमेश्वराची लेकरे अहोत आपल्यात वेगळेपण नाही हाच संदेश त्यांनी भारतीयांना दिला. जात, धर्म, पंथ, स्त्री, पुरुष असा कुठलाही भेदभाव म. गांधीजीना मान्य नव्हता. त्यांनी आयुष्यभर सर्वधर्मसद्‌भाव वाढविण्यासाठी प्रयत्न केले. एवढेच नाही त्यांचे आपल्या देशावर खूप प्रेम होते. माझ्या देशातल्या लोकांना घालायला कपडे नाहीत हे त्यांना माहित झाल्यावर त्यांनी संपूर्ण आयुष्य आर्धाअंगाने काढले. ते फक्त धोतर नेसत असत त्यांनी भारतीयांचे प्रतिक म्हणून स्विकारले कारण आम्ही सर्व एक आहोत ही भावना त्यांच्या मनात रुजली होती त्यांनी आयुष्यभर मुल्यांची जोपासणा केली. आजही भारतात अनेक, धर्म, पंथ, भाषा, रितीरिवाज, जाती, वंश आहेत या सर्वाना एका माळेत ओवण्याचे कार्य मा. गांधीजीच्या विचाराने केले आहे. आजही भारताला सर्वधर्मसमभाव या विचारांची गरज आहे आजही भारताला सर्वधर्म समभाव या विचारांची गरज आहे आजही हिंदू, मुस्लीम दंगे होत असतात अशा दंग्यामुळे मानवजातीची हानीच होणार ती टाळण्यासाठी म. गांधीजीच्या विचारांचा पुरस्कार करणे अत्यंत गरजेचे आहे तर देशाचा विकास होऊ शकतो.

**६) आत्मनिर्भता :-**

म. गांधी लहानपणापासून आपले कामे स्वतः करीत असत. प्रत्येकाने आपआपले काम स्वतः करावे अशा प्रकारची शिकवण त्यांनी आम्हाला दिली. आजही प्रत्येक व्यक्ती वा देश असो त्यांन आत्मनिर्भर होते आवश्यक आहे. देशाने आपल्या देशातील नागरीकांच्या गरजा देशात पूर्ण व्हाव्यात अशा प्रकारचा विकास केला पाहिजे असे म. गांधीजीचे स्वप्न होते. म. गांधीजीचा विचारांचा वारसा देशाचे पंतप्रधान मा. नरेंद्रजी मोदी पुढे नेत आहेत. 'आत्मनिर्भर भारत' हा त्यांनी नाराच दिला आहे. परकिय देशांपासून आयात कमी व्हावी यासाठी आपण कोरोना काळात मास्क, सॅनेटायझर, कोरोना किट, औषधी स्वतः तयार केल्या एवढेच नाही तर जगात कोरेणावर लस बनविण्यासाठी अनेक वैज्ञानिक प्रयत्न करीत होते. भारतीय वैज्ञानिकांनी देखील सर्वप्रथम भारतीय बनावटीची

कोरोना लस बनविली व मा. पतंप्रधान यांनी दिलेले आवाहन स्विकारले आणि संपूर्ण जनतेला कोरोना लस मोफत दिली गेली ज्याने अनेक लोकांचे प्राण वाचविण्यास मदत झाली. म. गांधीनी आत्मनिर्भरतेचा विचार दिला नसता तर आज आपण हे करु शकलो नसतो व लाखो जिवीतहानी झाली असती. अर्थात म. गांधीर्जीच्या विचारानेच सर्व भारतीयांचे प्राण वाचविण्यास मदत झाली.. आत्मनिरर्भरतेचा संदेश म. गांधीनी दिल्यामुळेच देश प्रगती करीत आहे. आपली आयात कमी झाली असून निर्यात वाढली आहे. आत्मनिर्भरतेमुळेच आपण जगाला कोरोना काळात औषधांची मदत केली. अनेक गरीब देशांना भारताने औषधी, कोरोना किट, मास्क, निर्यात केले व अनेक देशात लोकांचे प्राण वाचविण्यासाठी कार्य केले. अर्थात हे सर्व श्रेय म. गांधीजीच्या विचारांचेच आहे त्यांनीच आम्हाला आत्मनिर्भरतेचा मार्ग दाखविला म्हणजेच आजही आम्हाला म. गांधीजीच्या विचारांची गरज आहे तर आपण आपली प्रगती करु देशाला पुढे नेऊ शकतो.

**७) पंचायत राज :-**

भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर लोकशाही ची फळे सर्वसामान्य भारतीयांना चाखता यावी यासाठी म. गांधीनी पंचायतराजची संकल्पना मांडली होती. लोकशाही च्या माध्यमातून पंचायतराजचा पुरस्कार केला भारतातल्या खोड्यातील शेवटच्या माणसापर्यत सत्तेचे हस्तांतरण व्हावे व त्यांच्या जीवनातील संकटे दूर करण्यासाठी सत्तेचे विकेंद्रीकरण होणे आवश्यक आहे यावर म. गांधीजीचा विश्वास होता. आणि आज तो विश्वास सार्थक झाल्याचे दिसून येते आज ग्रामीण भागातील खेड्यात राहणारी आदिवासी समाजातील स्त्री देखील गावची प्रमुख / सरपंच होतांना आपल्याला दिसते. आदिवासी, दलित, शोषीत, पिडीत समाजापर्यत सत्तेचे विकेंद्रिकरण झालेले दिसते त्यामुळे सर्वसामान्य माणसाच्या समस्या सोडविण्यास मदत होतांना दिसून येते. गावातल्या समस्या गावातील व्यक्तीलाच माहीत असतात व त्याची सोडवणुक देखील कशी करायची याची त्याला जाणीव असते म्हणून आज सत्तेचे फळे सर्वसामान्य माणुस खात आहे ही सर्व देण म. गांधीजीची आहे. त्याच्या विचारांच्या तो विजय आहे. म्हणूनच आज देशाला विकसित राष्ट्र बनविण्याचे असेल तर म. गांधीच्या विचारांशिवाय पर्याय नाही देशातील सर्वसमस्याची सोडवणुक म. गांधीजीच्या विचारापासूनच होऊ शकते.

म. गांधीनी आयुष्यभर सत्य, अहिंसा, सर्वधर्मसमभाव, त्याग, स्वतंत्र्य, समता, मुल्य, न्याय, याचा विचारांचा पुरस्कार केला आज या विचारांची सर्व भारतीयांना गरज आहे तसेच जगाने म. गांधीर्जीचे विचार स्विकारले आहे. महात्मा गांधीर्जीची स्वदेशी चळवळ, त्यांची रामराज्याची संकल्पना, त्यांचे सर्वोदय विषयक विचार, त्यांचे शिक्षण पध्दतीतील विचार नई तालीम, ग्रामस्वराज्याची संकल्पना, मुल्य शिक्षण या सर्व विचारांची गरज अथवा प्रासंगिकता आजही जाणवते. अर्थात वर्तमान समस्या सोडविण्यासाठी म. गांधीजीच्या विचारांची उपयुक्तता आजही आहे या कोणाच्याही मनात शंका नाही.

– **प्रा. राजकुमार हरी खंदारे**
समाजशास्त्र विभाग प्रमुख

# स्पर्धा परीक्षेची तयारी....

स्पर्धा परीक्षेत यश मिळवून शासकीय सेवांच्या निवडीसाठी अनेक विद्यार्थी स्पर्धा परीक्षेची तयारी करत असतात. बरेच विद्यार्थी स्पर्धा परीक्षेची तयारी बारावीनंतर सुरू करतात, बरेच विद्यार्थी पदवी किंवा पदवीनंतर तयारीला सुरुवात करतात. त्यामध्ये बारावीनंतर तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांना तयारी करिता जास्त वेळ मिळतो त्यामुळे परीक्षेत यश मिळवण्याचे प्रमाण जास्त दिसून येते.

स्पर्धा परीक्षेत बसणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या खूप जास्त दिसून येते. पण त्यामध्ये तयारी करून परीक्षा देत असलेले विद्यार्थी कमी असतात आणि याच विद्यार्थ्यांमध्ये खऱ्या अर्थाने स्पर्धा दिसते.

स्पर्धा परीक्षेत ग्रामीण विद्यार्थी शहरी विद्यार्थ्यांच्या तुलनेत यश मिळविण्यामध्ये मागे दिसतात. त्याचे कारण म्हणजे ग्रामीण विद्यार्थ्यांना पाहिजे त्यावेळी योग्य असे मार्गदर्शन लाभत नाही. त्याचप्रमाणे शहरी भागाप्रमाणे वातावरण निर्मिती केल्या जात नाही. वातावरण निर्मिती म्हणजे, मी अनुभवलेला पुण्यातील जयकर लायब्ररी मधील स्पर्धा परीक्षेची तयारी करत असलेल्या विद्यार्थ्यांची धडपड व मिळालेले यश. यामध्ये अनेक विद्यार्थी जे आपल्यासारखे मध्यम कुटुंबामधले असतात. पण ते कठोर मेहनत करतात आणि स्पर्धा परीक्षा पास करतात. तेव्हा ती घटना आपल्याला अभ्यास करण्यासाठी एक वेगळी ऊर्जा देते. या ग्रंथालयात अभ्यास करत असताना विद्यार्थी वेगवेगळे विषय घेऊन आपली तयारी करत असतात. सर्व विद्यार्थी रोज काही वेळ विविध विषयांवर चर्चा करून विविध विषयाची आदान प्रदान करतात. ज्यामध्ये खऱ्या अर्थाने विद्यार्थी या परीक्षेसाठी विविध पैलूने तयार होत असतात. खऱ्या अर्थाने याला आपण वातावरण निर्मिती म्हणू शकतो.

महाविद्यालयात प्रवेश घेत असताना प्रत्येक विद्यार्थ्यांनि आपले ध्येय निश्चित करूनच त्यानुसार अनुसरण करून विषय निवडायला पाहिजे. कारण प्रत्येक व्यक्ती हा वेगळ्या परिस्थितीतून आलेला असतो. त्यामुळे त्याची आवड ही वेगळी असू शकते व त्यांने त्याचप्रमाणे आपले क्षेत्र निवडायला पाहिजे. त्यामध्ये आपला इंटरेस्ट महत्त्वाचा ठरतो! तुमचे ध्येय जर निश्चित असेल व त्याप्रमाणे तुम्ही स्वतःला तयार करीत पुढे गेलात तर यश तुम्हाला नक्कीच मिळते.

महाविद्यालयात प्रवेशित विद्यार्थ्यांची पार्श्वभूमी ही ग्रामीण असल्यामुळे स्पर्धा परीक्षाबद्दल त्यांना फारशी माहिती नसते. किंबहुना आवडही नसते! आपण या परीक्षेत पास होणार नाही, असा एक न्यूनगंड असतो. सर्वप्रथम आजच्या तरुणांनी हा न्यूनगंड दूर करून आपल्याला ज्या विषयाची आवड आहे, ते निवडून त्यामध्ये आपले करिअर निवडले पाहिजे कोणिही जन्मतःच बुद्धिमान नसतो. त्याच्या बुद्धीचा विकास आपल्या प्रयत्नातून, मेहनतीतून होत असतो.

जगलास तर असा जग<br>
की कुणालाही हेवा वाटावा<br>
मग हरलास तरी हरकत नाही<br>
पण तुझा पराभव नवा वाटावा

**– डॉ. एस. एस. धांडे**<br>
करिअर कौन्सलिंग अँड प्लेसमेंट सेल.

# SHRI. DR. R. G. RATHOD ARTS & SCIENCE COLLEGE



Reading Room of Library



Students Performing in laboratory



Placement Cell Activity



Students Performing in laboratory





Students Performing in laboratory

## SHRI. GOVINDSING RATHOD SHIKSHAN PRASARAK MANDAL, DAHATONDA'S

### शैक्षणिक संस्था

- स्व. सुनिल राठोड विद्यालय आणि कनिष्ठ कला महाविद्यालय, दहातोंडा.
- श्री. लक्ष्मण राठोड मागासवर्गीय मुलांचे वसतिगृह, दहातोंडा.
- वसंतराव नाईक विद्यालय व कनिष्ठ कला व विज्ञान महाविद्यालय हातगांव.
- सौ. दमयंतीबाई राठोड मागासवर्गीय मुलींचे वसतीगृह, दहातोंडा.
- श्रीमती सिताबाई राठोड प्राथमिक आश्रमशाळा, दहातोंडा.
- स्व. संजयभाऊ राठोड माध्यमिक आश्रम शाळा, दहातोंडा.
- स्व. अभिजीत राठोड मागासवर्गीय मुलांचे वसतीगृह, हातगांव.
- स्व. मेरासिंह बंधु गोवर्धनसिंह राठोड कला व विज्ञान उच्चमाध्यमिक, आश्रमशाळा, दहातोंडा.
- श्री. डॉ. आर.जी. राठोड कला व विज्ञान महाविद्यालय, मुर्तिजापूर.

